# दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १०३०/२०२४ नि. क्र. १ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी कलम ८ अन्वये बॉम्बे रेग्युलेशन नुसार वारसा दाखला मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत कामातील मयत **सिकंदर कासीम पटेल** हे दि.३१/१०/२०१७ मयत झाल्याचे आढळून येत आहे. प्रस्तुत अर्जदार हा मयत सिकंदर कासीम पटेल यांचा मुलगा असून त्यांनी त्यांचे **आडनाव शेख** असे नमूद केले आहे. परंतु उर्वरित वारसांपैकी मयताच्या मुलांची आडनावे पटेल अशी आहेत. त्यामुळे अर्जदार यांचे आडनाव शेख असल्याबाबतचे व ते मयत **सिकंदर कासीम पटेल यांचेच वारस असल्याबाबतच्या** खात्रीकरिता आवश्यक कागदपत्रे अभिलेखावर दाखल केल्याचे दिसून येत नाहीत. तरी अर्जदार यांनी **त्यांच्या आडनावाबाबत आणि ते मयताचे वारस असल्याबाबतची कागदपत्रे व अर्जदाराचे नाव असलेली शिधापत्रिका** अभिलेखावर दाखल करावी. त्याचबरोबर **सर्व वारसांची ओळखपत्रे** दाखल करावी. याबाबत अर्जदार यांनी पुर्तता करून युक्तीवाद करावा.

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2026.01.08 18:06:46 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA

उदगीर
दि.०८/०१/२०२६

**(के. ए. यादव)**
२ रे दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
उदगीर